पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – १७६**

(सभावृत्तांत)

**दिनांक – १७/०६/२०२०** **वेळ – दु. ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा **बुधवार दि.१७/०६/२०२०** रोजी दु.**०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे – सभापती**
२. मा.चोंधे आरती सुरेश
३. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
५. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
६. मा.कलाटे मयूर पांडुरंग
७. मा.कलाटे राहुल तानाजी
८. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
९. मा.कदम शशिकांत गणपत
१०. मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत
११. मा.संतोष बबन कांबळे
१२. मा.अभिषेक गोविंद बारणे
१३. मा.बुर्डे सुवर्णा विकास
१४. मा.फुगे भिमाबाई पोपट
१५. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
१६. मा.सुलक्षणा राजू धर

या शिवाय मा.श्रावण हर्डीकर – आयुक्त, मा.पाटील - अति.आयुक्त (१), मा.पवार – अति.आयुक्त (२), मा.तुपे – सह शहर अभि. तथा प्र.अति.आयुक्त (३), मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर – मुख्य लेखापरिक्षक, मा.पाटील – शहर अभियंता, मा.भालकर, मा.सवणे, मा.तांबे – सह शहर अभियंता, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.पवार – उपसंचालक नगररचना, मा.जोशी, मा.खांडेकर - सहाय्यक आयुक्त, मा.गायकवाड – प्र.मुख्य उद्यान अधिक्षक, मा.पाटील – प्राचार्य, औ.प्र.कें., मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, मा.चव्हाण. मा.जुंधारे, मा.पोरेड्डी, मा.रामगुडे – कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

(पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर श्री.प्रविण तुपे, सह शहर अभियंता (वि/यां) यांची मा.प्र.अति.आयुक्त (३) या पदावर नेमणूक करणेत आली असल्याने मा.स्थायी समितीच्या वतीने मा.सभापती, मा.आयुक्त यांचे हस्ते सत्कार करणेत आला.)

----------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.राहूल कलाटे

भारत चीन सैन्यांमधील चकमकीत २० भारतीय जवान शहिद झाले असलेने त्यांना आजच्या सभेत श्रध्दांजली वाहण्यात यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

--------

( सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अपर्ण केली)

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले -**

विषय क्र.१९) इतर खर्च या लेखाशिर्षावर तरतुद वर्ग करणेबाबत.

विषय क्र.२०) मानधनावर नेणूकीबाबत – मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२१) पंडित दिनदयाळ उपाध्याय – महिलांसाठी ज्ञान कौशल्य कार्यक्रम या योजनेअंतर्गत वस्तीपातळीवर प्रशिक्षण योजना सन २०२०-२०२१ या कालावधीत राबविणेबाबत - मा.राजेंद्र लांडगे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२२) मनपाचे आरक्षण क्र.४१७ पुनावळे येथील ऑक्सीजन पार्क उद्यान देखभाल व संरक्षण कामाबाबत. – मा.राहूल कलाटे, मा.शितल शिंदे यांचा प्रस्ताव

विषय क्र.२३) श्री.तुकाराम बाबुराव सणस यांचे अपिल अर्जाबाबत – मा.आरती चोंधे, मा.भिमाबाई फुगे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक १०/०६/२०२० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१७५) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ७१६०	विषय क्रमांक – १
दिनांक – १७/०६/२०२०	विभाग – इ क्षेत्रिय, ज.नि.
सुचक – मा.राजेंद्र लांडगे	अनुमोदक – मा.भिमाबाई फुगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.इक्षेका/जनि/कावि/६५२/२०२०, दि.२२/०५/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे विविध प्रभागातील जलनि:सारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने साफ सफाई करणे व चोकअप काढणेचे काम ठेकेदार मे.आर्यन पंप्स ॲन्ड एन्व्हायरो सोल्युशन प्रा. लि. हे करीत आहेत. सदर कामाचे निविदा अटी शर्ती (A) मधील अट क्र.४ नुसार सदर निविदेचा कालावधी ५ वर्षांचा असुन सुरुवातीस कामाचा आदेश १ वर्षासाठी द्यावयाचा आहे. त्यानंतर कामाची प्रगती, Performance विचारात घेवून पुढील प्रत्येक वर्षासाठी मा. स्थायी समितीच्या मान्यतेचे मुदतवाढ देणेत येईल याप्रमाणे अटी व शर्तीमध्ये नमुद करणेत आलेले आहे. मनपाच्या आठ प्रभागामध्ये सदर कामे चालू असुन, एकुण आठ पैकी ब, क, ड, इ, फ, ग व ह प्रभागातील कामांची मा.स्थायी समितीने ठरावात नमुद केलेली १ वर्ष कालावधीची मुदत पुर्ण होत असल्यामुळे सदर कामांना १ वर्षासाठी मुदतवाढ घेणे आवश्यक आहे. त्याकामी ब, क, ड, इ, फ, ग व ह प्रभागातील कामांची माहिती खालील तक्त्याप्रमाणे नमुद केलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम व निविदा स्विकृत दर | ठेकेदाराचे नाव | निविदा अटी शर्ती (A ) मधील अट क्र. ४ नुसार प्रस्तावित दर | कामाची मुदत संपण्याचा दिनांक व वर्ष | प्रस्तावित मुदतवाढ दिनांक व वर्ष | मा.स्थायी समिती मान्यतेकामी रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड म.न.पा.चे “ब” प्रभागातील जलनि:सारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणे (निविदा क्र.१२/०४/२०१४-१५) | १,०६,१२,८०० दर–४.८४% कमी | मे.विशाल सिव्हलि कॉन्ट्रॅक्टर | निविदा स्विकृत दरापेक्षा २५.०० % जास्त | दिनांक २३/०६/२०२० (पाचवे वर्ष) | नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत | रक्कम रुपये- ६३,११,९६३ |
| २ | पिंपरी चिंचवड म.न.पा.चे “क” प्रभागातील जलनि:सारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणे (निविदा क्र.१२/०२/२०१४-१५) | १,०५,५१,२७६ दर–१.५०% कमी | मे. आर्यन पंप्स ॲन्ड एन्व्हायरो सोल्युशन प्रा. लि. | निविदा स्विकृत दरापेक्षा ३०.०० % जास्त | दिनांक ०१/०७/२०२० (चौथे वर्ष) | दिनांक ०१/०७/२०२१ (पाचवे वर्ष) | रक्कम रुपये- १,३५,१०,९०९ |
| ३ | पिंपरी चिंचवड म.न.पा.चे “ड” प्रभागातील जलनि:सारण नलिका व मॅनहोल चेंबर्सची यांत्रिकी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणे. (निविदा क्र.१२/५/२०१४-१५) | १,०६,१४,६०० दर–५% कमी | मे.सुरज कॉन्ट्रॅक्टर | निविदा स्विकृत दरापेक्षा ३०.०० % जास्त | दिनांक ०४/०७/२०२० (चौथे वर्ष) | दिनांक ०४/०७/२०२१ (पाचवे वर्ष) | रक्कम रुपये- १,३१,०९,०३१ |
| ४ | पिंपरी चिंचवड म.न.पा.चे “इ” प्रभागातील जलनि:सारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणे (निविदा क्र.८/१/२०१५-१६) | १,०५,५०,२६८ दर–१% कमी | मे. आर्यन पंप्स ॲन्ड एन्व्हायरो सोल्युशन प्रा. लि. | निविदा स्विकृत दरापेक्षा ३०.०० % जास्त | दिनांक २४/०२/२०२० (चौथे वर्ष) | दिनांक २४/०२/२०२१ (पाचवे वर्ष) | रक्कम रुपये- १,३५,७८,१९५ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | “फ” क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील जलनि:सारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणे(निविदा क्र.१२/०६/२०१४-१५) | १,०५,३९,९०० दर–४.८४% कमी | मे.सुरज कॉन्ट्रॅक्टर | निविदा स्विकृत दरापेक्षा १९.३५ % जास्त | दिनांक ११/०६/२०२० (पाचवे वर्ष) | नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत | रक्कम रुपये- ५९,८५,२६५ |
| ६ | पिंपरी चिंचवड म.न.पा.च्या “ग” प्रभागातील जलनि:सारण नलिकांची यांत्रिकी पध्दतीने वार्षकि साफसफाई करणे व चोकअप काढणे.(निविदा क्र.३२/१/२०१७-१८) | ९८,९३,१०० दर–२% कमी | मे.विशाल सिव्हलि कॉन्ट्रॅक्टर | निविदा स्विकृत दरापेक्षा १०.०० % जास्त | दिनांक ३०/०७/२०२० (दुसरेवर्ष) | दिनांक ३०/०७/२०२१ (तिसरे वर्ष) | रक्कम रुपये- १,०६,६४,७६२ |
| ७ | पिंपरी चिंचवड म.न.पा.च्या “ह” प्रभागातील जलनि:सारण नलिकांची यांत्रिकी पध्दतीने वार्षकि साफसफाई करणे व चोकअप काढणे.(निविदा क्र.१/१/२०१८-१९) | ९८,९७,०४८ दर–०% कमी(अंदाज पत्रकीय दराने) | मे.मनिष असोसिएटस | निविदा स्विकृत दरापेक्षा १०.०० % जास्त | दिनांक ११/०६/२०२० (दुसरेवर्ष) | दिनांक ११/०६/२०२१ (तिसरे वर्ष) | रक्कम रुपये- १,०८,८६,७५३ |
| | | | | | | एकुण र.रु. | ७,४०,४६,८७८ |

‘ब’, ‘क’, ‘ड’, ‘इ’, ‘फ’, ‘ग’, व ‘ह’ प्रभागातील कामांचे ठेकेदार यांनी त्यांचे काम समाधानकारकरित्या पुर्ण केले असल्याने व विषयांकित कामांच्या निविदा अटी व शर्ती (A) मधील अट क्र. ४ नुसार २ वर्षानंतर पुढील प्रत्येक वर्षासाठी निविदा दारात १०% वाढ करून देणेची तरतुद आहे. निविदा अटी व शर्ती प्रमाणे ‘ब’, ’क’, ‘ड’, ‘इ’ व ‘फ’ क्षेत्रीय कार्यालयातील कामाच्या ठेकेदार यांना मागील वर्षा करिता १०% निविदा दरात दरवाढ देणेत आली होती. तसेच ग व ह क्षेत्रीय कामाची नुकतीच २ वर्ष कालावधीची मुदत पुर्ण होत असल्यामुळे सदर कामांसाठी पुढील वर्षासाठी निविदा दरात १०% वाढ करून देण्याची तरतुद आहे. निविदा अटी व शर्ती प्रमाणे ‘क’, ’ड’, ‘इ’, ‘ग’ व ‘ह’ क्षेत्रीय कार्यालयातील कामाच्या ठेकेदार यांना पुढील १ वर्ष कालावधीसाठी मागील वर्षापेक्षा १०% दरवाढ देणेस तसेच ‘ब’ व ‘फ’ क्षेत्रीय कार्यालयातील कामांना ५ वर्षांपैकी अंतिम वर्षाचे कामाचे आदेश देण्यात आलेले असून त्यांच्या कामाची मुदत अनुक्रमे दि.२३/०६/२०२० व दिनांक ११/०६/२०२० रोजी संपत आहे. सद्यस्थितीत कोरोना विषाणू मुळे (COVID–19) उदभवलेल्या परिस्थितीत अत्यावश्यक कामांसाठी तातडीने निविदा प्रक्रिया राबविणेचे काम चालू आहे. सबब ‘ब’ व ‘फ’ क्षेत्रिय कार्यालयातील कामांस नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत निविदा अटी शर्ती (A) मधील अट क्र.४ नुसार निविदा दरात नव्याने वाढ न करता पाचव्या वर्षाच्या दराने म्हणजेच निविदा दरात अनुक्रमे २५.००% जास्त व १९.३५% जास्त दरवाढीसह नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत मुदतवाढ मिळणेकामी प्रस्तावास वरील प्रपत्रामध्ये दर्शविल्याप्रमाणे एकुण र.रू.७,४०,४६,८७८/- (अक्षरी र.रू.सात कोटी चाळीस लाख शेहेचाळीस हजार आठशे अठ्याहत्तर फक्त) पर्यंत ‘ब’, ‘क’, ‘ड’, ‘इ’, ‘फ’, ‘ग’, व ‘ह’ प्रभागातील जलनिःसारण नलिका साफसफाई करणेचे काम करून घेणेस मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी असली तरी, प्रस्तुत विषयांतील अ.क्र.१ व अ.क्र.५ या कामांकरिता ३ महिने अथवा नविन निविदा कार्यवाही पुर्ण होईपर्यंत यापैकी जे आधी होईल त्या कालावधीपर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१६१ विषय क्रमांक – २
दिनांक – १७/०६/२०२० विभाग – अ क्षेत्रिय, स्थापत्य
सुचक – मा.अंबरनाथ कांबळे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/अक्षेका/कावि/४९/२०२०, दि.२६/०५/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे प्रभाग क्र.१५ मध्ये आकुर्डी येथील नाट्यगृहाची उर्वरीत कामे करणेकामी नाट्यगृह हे पर्यटन विकास प्रकल्पांतर्गत करणेत येत असून, सदर इमारतीचे आराखडे व अंदाजपत्रके तयार करणेकामी तज्ञ आर्किटेक्ट म्हणून मे.पी.के.दास अँड असोसिएट्स यांची मा.स्थायी समिती ठराव क्र.६२२, दि.१२/०६/२०१२ अन्वये नेमणुक करणेत आलेली आहे. सदर प्रकल्प मनपाच्या पर्यटन विकास आराखडा लेखाशिर्षांतर्गत करणेत येत आहे. सदर प्रकल्पाचे तपशिलवार आराखडे व अंदाजपत्रके तयार करणेचे आदेश दि.२१/०३/२०१३ चे पत्रान्वये मे.पी.के.दास अॅन्ड असोसिएट्स यांना देणेत आलेले आहेत त्यानुसार मे.पी.के.दास अॅन्ड असोसिएट्स यांनी मनपाच्या मागणीनुसार नाट्यगृह प्रकल्प इमारतीचे तपशिलवार आराखडे व अंदाजपत्रके तयार केलेली आहेत. सदर टप्पा -१ चे काम पुर्ण करणेत आलेले आहे, तसेच टप्पा – २ चे अंतर्गत सजावट व बाह्य सुशोभिकरणाचे काम करणेकामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणुक करणे आवश्यक आहे. सदर प्रकल्प हा वैशिष्ट्य पुर्ण असुन, पिंपरी चिंचवड शहराच्या सौंदर्यात व लौकिकामध्ये भर टाकणारा आहे. तांत्रिक दृष्ट्या प्रकल्पाचे स्वरुप व मानांकन हे वैशिष्ट्य पुर्ण आहे. तांत्रिक दृष्ट्या आराखड्याप्रमाणे काम करुन घेणे त्यांचे मोजमापे घेऊन देयक तयार करणे, प्रकल्पाचा दैनंदिन कामावर देखरेख करणे, निविदा निर्देशानुसार गुणवत्ता तपासणी करणे, म.न.पा.चे अभियंत्यांकडील इतर कामांचा व्याप पाहता व प्रकल्पावरील दैनंदिन कामे परिणामकारक होणेकरीता सदर प्रकल्पासाठी निविदा पश्चात कामांकरीता प्रकल्प व्यवस्थान सल्लागारांची नेमणुक करणे आवश्यक आहे. मे.पी.के.दास अॅन्ड असोसिएट्स यांनी पर्यावरणाशी संलग्न अर्बन प्लॅनिंग, इंटेरियर डिझायनर्स, हाऊसिंग प्रोजेक्टस् इ. कामे मोठ्या प्रमाणात केलेली आहेत . त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर केलेल्या कामाचा विचार करता, त्यांची मनपाच्या सद्यस्थितीतील पर्यटन विकास आराखडा अंतर्गत अनेक प्रकल्पासाठी तज्ञ वास्तुविशारद म्हणुन नेमणुक केलेली आहे. त्यानुसार ते कार्यरत आहेत. त्यांनी मनपाला आतापर्यंत वेळोवेळी आवश्यक मागणीनुसार सेवा दिलेली आहे. त्यानुसार वास्तुविशारदांचे दृष्टीकोनातुन संकल्प चित्राप्रमाणे प्रत्यक्ष जागेवर नियोजित वेळेत अंमलबजावणी होणेचे दृष्टीने निविदा पश्चात कार्यवाहीसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून त्यांची नेमणुक करणे उचित होईल. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागा यांचेकडील शासन निर्णयनुसार सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क व त्यांच्या प्रदानाबाबत मार्गदर्शक सुचना नुसार शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क.५४/नवि-१६, मंत्रालय, मुंबई-४०००३२ दि.०४/०६/२०१८ अन्वये खालील प्रमाणे टप्पे विहित करणेत आले आहेत.

| अ.क्र. | प्रकल्पाच्या/कामाच्या प्रगतीचा टप्पा | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्काचे प्रदानाचे प्रमाण (प्रकल्प किंमतीच्या प्रमाणात) | |
|---|---|---|---|
| | | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत प्रकल्पासाठी | इतर सर्व कामांसाठी |
| १ | प्रकल्पाचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर | ०.७५%(डीपीआर ०.५०% + प्र.मा.-०.२५%) | ०.५० (डीपीआर ०.३३% +प्रमा-०.१७%) |
| २ | प्रकल्पातील कामाचे कार्यादेश दिल्यानंतर | ०.२५% | ०.१६ |
| ३ | प्रकल्पाचे २५ टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.४०% | ०.२७ |
| ४ | प्रकल्पाचे ५० टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.४०% | ०.२७ |
| ५ | प्रकल्पाचे ७५ टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.६०% | ०.४० |
| ६ | प्रकल्पाचे १०० टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.६०% | ०.४० |
| एकुण | | ३.००% | २.००% |

वरील बाबींचा विचार करता व मे.पी.के.दास अँड असोसिएट्स यांचेकडील पत्रानुसार सदर प्रकल्पाच्या टप्पा-२ च्या निविदा पश्चात कामाकरीता प्रकल्प व्यस्थापन सल्लागार म्हणून काम करणेस व त्यासाठी सदर कामाकरीता निविदा पश्चात फी म्हणून प्रकल्प किंमतीच्या १.३५% एवढी फी मध्ये काम करण्याची मे.पी.के.दास अँड असोसिएट्स तयारी दर्शविली आहे. या सर्व बाबींचा विचार करता, कामाचे स्वरुप तसेच तातडीची आवश्यकता पाहता मनपा पर्यटन विकास आराखडा (TDP) अंतर्गत प्रभाग क्र.१५ मध्ये आकुर्डी येथील नाट्यगृहाची उर्वरीत कामे करणे. (अंतर्गत सजावट व बाहेरील सुशोभिकरण कामे करणे) प्रकल्पासाठी तज्ञ वास्तुविशारद मे.पी.के.दास असोसिएट्स यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणुन निविदा पश्चात कामासाठी (Post Tender) नेमणुक करणेचा प्रस्ताव आहे. प्रस्तुत निविदा पुर्व कामाकरीता आर्किटेक्चरल सर्व्हिसेस मे.पी.के.दास अँड असो. यांनी पुरविलेल्या आहेत. या बाबींचा विचार करता प्रकल्प यशस्वीपणे व तांत्रिक दृष्ट्या पुर्ण होणेकामी निविदा पश्चात काम मे.पी.के.दास अँड असो यांना महाराष्ट्र शासन निर्णयाच्या निर्धारीत दरापेक्षा कमी दराने म्हणजेच प्रकल्प किंमतीच्या १.३५% या दराने अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१६२ विषय क्रमांक – ३

दिनांक – १७/०६/२०२० विभाग – ग क्षेत्रिय, विद्युत

सुचक – मा. शशिकांत कदम अनुमोदक – मा.सुवर्णा बुर्डे

संदर्भ – मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांचे पत्र क्र.वि/गक्षे/थेर/२६५/२०२०, दि.०३/०६/२०२०

मा.सह शहर अभियंता(वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत सांगवी-किवळे या बी.आर.टी.एस. रस्त्यावरील काळेवाडी फाटा ते डांगे चौक दरम्यान कावेरीनगर येथे नव्याने सब-वे बांधणेत आला आहे. सदर सब-वेच्या कामामुळे १३२ केव्ही टॉवर लाईनचे जमिनी पासुनचे (Vertical Clearance) नियमापेक्षा कमी होत

असल्याने अपघात होण्याची शक्यता असल्याने, सदर टॉवर लाईनची उंची वाढविणे आवश्यक असल्याने याबाबत सर्व्हे करुन महाराष्ट्र राज्य विज पारेषण कंपनीने अंदाजपत्रक तयार करुन पत्र क्र SE/EHV/O&M/ Circle/PN/0430/ दि.5/3/2020 अन्वये या विभागास सादर केले आहे. सदरचे काम वीज पर्यवेक्षण शुल्क अदा करुन मनपा करणार आहे. त्यामुळे सदर कामाचे वीज पर्यवेक्षण शुल्क रक्कम रु.३२,६०,३५४/- भरणे बाबत INVOICE NO 6100/ 1920/ 0000105 अन्वये महाराष्ट्र राज्य विज पारेषण कंपनीने कळविले आहे.सदरची रक्कम काम सुरु करणे पुर्वी भरणे आवश्यक आहे. तरी सदरची र.रु.३२,६०,३५४/-(अक्षरी र.रू.बत्तीस लाख साठ हजार तीनशे चोपन्न फक्त) अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१६३ विषय क्रमांक – ४
दिनांक – १७/०६/२०२० विभाग – मध्यवर्ती भांडार
सुचक – मा.भिमाबाई फुगे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.मभां/०८/कावि/७४६/२०२०, दि.०८/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

भारतीय साथरोग प्रतिबंधात्मक कायदा 1897 व महापालिका अधिनियम कलम 63 (6) मधील तरतुद विचारात घेता वरील संसर्गजंन्य रोग नियंत्रणात आणणेसाठी, प्रतिबंधात्मक उपाय करणे आवश्यक असलेने मनपाचे वाय.सी.एम.रुग्णालयास आवश्यक लागणारे PPE Kit with N95 Mask खरेदी करणेकामी अल्पमुदतीची ई.नि.सु.क्र.1/2020-21 अन्वये मे.केप्स फार्मा, मुंबई यांचेकडुन प्राप्त झालेला निविदा लघुत्तम दर र.रु.827.62 + GST प्रती कीट स्विकृत करण्यात आलेला असुन त्यानुसार करारनामा करणेस व संबंधित आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकीय तरतुदींचे मर्यादेत सदर पी.पी.ई.10000 किट खरेदी करणेकामी एकूण र.रु.82,76,200 + GST चे खर्चास मनपा अधिनियम कलम 73 (क) नुसार मान्यता देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणई असली तरी, प्रस्तुत विषयातील केप्स फार्मा हि मुंबईची एजन्सी आहे. तरी कोविड-१९ कोरोनाचा प्रादुर्भाव विचारात घेता यापुढील काळात पीपीई कीटची आवश्यकता भासल्यास प्रस्तुत निविदेतील मे.कोठारी मेडीकल ही स्थानिक एजन्सी असल्याने त्यांच्याकडून L1(केप्स फार्मा) यांनी दिलेल्या (८२७.६२ + GST प्रति कीट) दरात पीपीई कीट खरेदी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१६४ विषय क्रमांक – ५
दिनांक – १७/०६/२०२० विभाग – वाय.सी.एम.एच.
सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.वायसीएमएच/११/कावि/६२०/२०२०, दि.०८/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामध्ये सद्या

कार्यरत असलेल्या सी.पी.एस. डॉक्टर्स यांनी दि.०१ एप्रिल २०२० पासून विद्यावेतन रक्कमेत वाढ करण्यासंदर्भात विनंती केलेली आहे. महाराष्ट्र शासन, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.एमईडी १०१५/२६२/१५/शिक्षण -२,दिनांक १६ जानेवारी २०१६ नुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, शासकीय दंत महाविद्यालये आणि शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयांतील पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांच्या (कनिष्ठ निवासी व वरिष्ठ निवासी) विद्यावेतनात वाढ करणेबाबतचे शासन निर्णयाचे अवलोकन केले असता, सदर शासन निर्णयामध्ये राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील कनिष्ठ निवासी - १/२/३ व वरिष्ठ निवासी - १/२/३ आणि दंत पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थी तसेच, शासकीय आयुर्वेद पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना ( कनिष्ठ निवासी - १/२/३) पुढील प्रमाणे विद्यावेतन लागू केले आहे.

**तक्ता-अ वैद्यकीय पदव्युत्तर पदवी/पदविका/ अतिविशेषोपचार**

| अ.क्र. | पदनाम | मुळवेतन | मुळवेतन विद्यावेतनाच्या ५० टक्के | महा.भत्ता(असुधारित) २१२ टक्के | विशेष वेतन आणि ठोक वाढ | एका महीन्याचे विद्यावेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ट निवासी १ | ६६०० | ३३०० | २०,९८८ | ५२५+७०००+५००० | ४३,४१३ |
| २ | कनिष्ट निवासी २ | ६७०० | ३३५० | २१,३०६ | ५२५+७०००+५००० | ४३,८८१ |

तसेच उक्त शासन निर्णयामध्ये राज्य शासनाच्या कर्मचा-यांना वेळोवेळी ज्या दराने महागाई भत्ता अनुज्ञेय राहील, त्याच दराने उपरोल्लेखित कनिष्ठ/वरिष्ठ निवासींना व दंत पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या आणि शासकीय आयुर्वेद महाविद्यालयातील कनिष्ठ निवासी विद्यार्थ्यांना महागाई भत्ता अनुज्ञेय राहील. असेही नमुद केलेले आहे.त्यामुळे वाय.सी.एम.रुग्णालयात सद्या कार्यरत असलेल्या सर्व सी.पी.एस.डॉक्टर्स यांना उक्त शासन निर्णयात नमुद केलेप्रमाणे एका महीन्याचे विद्यावेतन तसेच सदर विद्यावेतन ज्या तारखेपासून लागू करावयाचे आहे त्यावेळचा अनुज्ञेय असलेला महागाईभत्ता असे एकुण विद्यावेतन अदा करावे लागणार आहे. महाराष्ट्र शासन,वित्त विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.मभवा-२०१८/प्र.क्र.१८/सेवा-९, दि.१६/१०/२०१८ अन्वये महागाई भत्ता दर २६८% वरुन २७४% करणेत आलेला आहे. त्यानुसार वाय.सी.एम. रुग्णालयातील सर्व सी.पी.एस.डॉक्टर्स यांना दि.०१ एप्रिल २०२० पासून पुढीलप्रमाणे विद्यावेतन अदा करावे लागणार आहे.

**प्रपत्र अ** **(रुपये)**

| अ.क्र. | पदनाम | मुळवेतन | मुळवेतन विद्यावेतनाच्या ५० टक्के | महा.भत्ता (असुधारित) २७४ टक्के | विशेष वेतन आणि ठोक वाढ | एका महीन्याचे विद्यावेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ट निवासी १ | ६६०० | ३३०० | २७,१२६ | ५२५+७०००+५००० | ४९,५५१ |
| २ | कनिष्ट निवासी २ | ६७०० | ३३५० | २७,५३७ | ५२५+७०००+५००० | ५०,११२ |

वाय.सी.एम.रुग्णालयात दि.०१/०८/२०१८ पासून दोन वर्षा करीता सेवा करणेस एकुण ३३ सी.पी.एस.डॉक्टरांची विविध आदेशान्वये नियुक्ती करणेत आलेली आहे. त्यामुळे त्यांना उक्त तक्त्यात नमुद केले प्रमाणे प्रथम वर्षाकरीता एका महीन्याचे विद्यावेतन र.रु.४९,५५१/- व द्वितीय वर्षाकरीता एका महीन्याचे विद्यावेतन र.रु.५०,११२/- दि.१ एप्रिल २०२० पासून लागू करणेस आदेश जा.क्र.वायसीएमएच/ ११/कावि/५६९/२०२०, दिनांक ०८ /०६/२०२० अन्वये मंजुरी दिलेली आहे. सी.पी.एस. डॉक्टरांचा दरमहा विद्यावेतनाचा होणारा एकुण खर्च वाय.सी.एम. रुग्णालयाचे सन २०२०-२१ मधील अंदाजपत्रकातील **"विद्यावेतन"** या लेखाशिर्षावर करणेत आलेल्या र.रू.१,००,००,०००/- (अक्षरी र.रु.एक कोटी) मधून खर्ची टाकण्यात आलेला असून, सदर विषयास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१६५ विषय क्रमांक – ६

दिनांक – १७/०६/२०२०

सुचक – मा.झामाबाई बारणे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.सुनिता तापकिर, मा.शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव –

मा.शहर सुधारणा समिती ठराव क्र.२२ दि.०८/०६/२०२० अन्वये मा.सुनिता तापकीर, मा.शर्मिला बाबर यांनी प्रस्तावित केलेनुसार "नागरवस्ती विकास योजना विभागाकडील मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत महिला, मुले / मुलींसाठी विविध प्रकारच्या कल्याणकारी योजना राबविल्या जातात. त्यापैकी "मागासवर्गीय युवकांना / युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण" ही एक प्रशिक्षण योजना आहे. या प्रशिक्षण योजने अंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीय मध्ये समाविष्ट सर्व जाती व तत्सम पोटजाती जमाती यांनाच प्रशिक्षणाचा लाभ घेता येईल. मागासवर्ग प्रवर्गातील युवक आणि युवतींचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास होण्याच्या दृष्टीने ही प्रशिक्षण योजना राबविण्याचा मानस आहे. "मागासवर्गीय युवकांना / युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण" ही प्रशिक्षण योजना मे.नॅशनल कॉर्पोरेशन ऑफ इन्फॉरमेशन टेकनॉलॉजी (इंडिया) - एन.सि. आय.टी.(इंडिया) आकुर्डी, पुणे-१९ ही संस्था पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील आहे व आवश्यकतेनुसार तात्काळ मनुष्यबळाची उभारणी करणेची क्षमता तसेच मोठ्या प्रमाणावरील कामकाज करणेसाठीची आवश्यक असलेली आर्थिक क्षमता व विशेष करून वस्तीपातळीवरील प्रशिक्षण देण्याचा या संस्थेला भरपूर अनुभव आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आय.टी.आय. मार्फत विविध व्यवसायांचे प्रशिक्षण देण्याचे काम चालते. सदरचे प्रशिक्षण हे आय.टी.आय. येथील प्रशिक्षण केंद्रात चालत असते. मात्र "मागासवर्गीय युवकांना/युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण" या योजने अंतर्गतचे प्रशिक्षण हे वस्तीपातळीवर द्यावयाचे आहे. त्यामुळे वस्तीपातळीवर प्रशिक्षण देण्यासाठी तयारी करणे, प्रशिक्षण निहाय आवश्यक साधन सामग्री उपलब्ध करणे, सदर प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक/प्रशिक्षिका यांची नेमणूक करणे, इतर आवश्यक मनुष्यबळ/कर्मचारी यांची नेमणूक करणे, त्यांचे मानधन ठरविणे इत्यादी प्रशासकीय व तांत्रिक कामकाज करणे हे त्यांच्या

चालु कामाच्या व्यापाचा व तद्नुषंगीक बाबींचा विचार करता सदर योजनेची अंमलबजावणी आय.टी.आय. मार्फत तातडीने होणे शक्य नाही. त्यानुसार तातडीने योजना सुरु होणेकामी, तसेच निविदा पध्दतीने संस्था निवडीसाठी लागणारा प्रदीर्घ कालावधीचा विचार करता, व चालु वर्षाच्या कामासाठीचे संस्थेमार्फत प्रशिक्षणाचे सादर दरही रास्त असलेने प्रशिक्षणास इच्छुक असलेले कुठलेही युवक/युवती प्रशिक्षणापासून दिर्घ कालावधीमुळे वंचित राहू नये. त्यामुळे निविदा न मागविता थेट पध्दतीने "मागासवर्गीय युवकांना/युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण" या योजनेअंतर्गत मनपास्तरावर एकुण २५ विषयांचे प्रशिक्षण हे लाभार्थ्यांसाठीचे पात्रता निकष (अटी व शर्ती), सोबतच्या "प्रपत्र-अ" मधील नमुद तपशिल व संस्थेमार्फत सादर अभ्यासक्रमानुसार व दरानुसार (सर्व करांसहित) चालुवर्षी दि. ३१/०३/२०२१ अखेरपर्यंतच्या कालावधीपर्यंतचे प्रशिक्षणाचे काम हे औद्योगिक प्रशिक्षण संस्था / केंद्र (पिं.चिं.मनपा.) यांचा अभिप्राय घेऊन व त्यानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करुन मे.नॅशनल कॉर्पोरेशन ऑफ इन्फॉरमेशन टेकनॉलॉजी (इंडिया) - एन.सि.आय.टी. (इंडिया) आकुर्डी, पुणे - १९ यांचेमार्फत देणेस मान्यता देणेत येत यावी. संस्थेमार्फत विविध व्यवसाय प्रशिक्षणात सहभाग घेतलेल्या युवक/ युवतींना रोजगार/ स्वयंरोजगारास प्रवृत्त करणे, त्यासंबंधीत व्यवसाय उभारणी ते विक्री, विक्री पश्चात सेवा तसेच जमा खर्च नोंदी, आवश्यक परवानगी / दाखले इत्यादीबाबत त्यांना मार्गदर्शन करणे बंधनकारक राहील. या योजनेबाबत महापालिकेच्या धोरणानुसार लाभार्थ्यांकडुन आवश्यक ती कागदपत्रे घेण्यात यावी. मागासवर्गीय युवक / युवतींना (उत्पन्न गटाची अट न ठेवता) प्रशिक्षणास विषयानुरुप एकुण प्रशिक्षण शुल्काच्या (प्रति लाभार्थी प्रत्यक्ष प्रशिक्षण शुल्क + १८% प्रमाणे जीएसटीची होणारी रक्कम रुपये) या रक्कमेच्या ९०% प्रमाणे होणारी रक्कम ही एकुण प्रशिक्षण शुल्क म्हणुन समजण्यात यावी व त्यानुसार प्रति लाभार्थी झालेल्या प्रशिक्षणाचे शुल्क संस्थेस अदा करणेत यावे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर महानगरपालिकेचे आर्थिक हित साधले जाणार आहे. त्यामुळे निविदा न मागविता थेट पद्धतीने "मागासवर्गीय युवकांना/युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण" या योजनेअंतर्गत मनपास्तरावर एकूण २५ विषयांचे प्रशिक्षण हे सोबत जोडलेल्या 'प्रपत्र-अ' मधील नमुद तपशील व संस्थेमार्फत सादर होणाऱ्या अभ्यासक्रमानुसार व महानगरपालिका मान्य दरानुसार चालुवर्षी सन २०२०-२०२१ ह्या आर्थिकवर्षातील दिनांक ३१/०३/२०२१ अखेर पर्यंतच्या कालावधीपर्यंतचे प्रशिक्षणाचे औद्योगिक प्रशिक्षण संस्था/केंद्र (पिंपरी – चिंचवड महानगरपालिका) यांचा मे.नॅशनल कॉर्पोरेशन ऑफ इन्फॉरमेशन टेकनॉलॉजी (इंडिया) - एन.सि.आय.टी. (इंडिया) आकुर्डी, पुणे-१९ यांचे मार्फत सादर प्रशिक्षण विषयांचे दर, अभ्यासक्रम, कालावधी इत्यादी बाबत अभिप्राय घेऊन व त्यानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करून मे.नॅशनल कॉर्पोरेशन ऑफ इन्फॉरमेशन टेकनॉलॉजी (इंडिया) - N.C.I.T (इंडिया) आकुर्डी, पुणे-१९ यांचे मार्फत प्रशिक्षण देणेस मान्यता देणेत यावी. तसेच प्रशिक्षणातील इच्छुक मागासवर्गीय युवक व युवतींच्या मागणीनुसार २ तासांऐवजी त्यांचे मागणीनुसारच्या तासिकेत त्यांना प्रशिक्षण देणेत यावेत. चालु आर्थिक वर्षातील वर्षाआरंभी पासुनच योजनेचे काम चालु असणार असल्याने संस्थेवर होणा-या कामाच्या ताणाचा विचार करता तसेच मागासवर्गीय युवक व युवतींच्या वेळेअभावी त्यांना इतर पुरक विषयांच्या सलग्न प्रशिक्षणास प्रवृत्त करू नये. युवक व युवतींच्या मागणीनुसारच्या कालावधीत व वेळेत सदर प्रशिक्षणाचे आयोजन करणेत यावे. सदर योजनेअंतर्गत महापालिका हद्दीतील मागासवर्गीय युवक व युवतींच्या ज्ञानात व कौशल्यात वाढ व्हावी, व्यवसाय करून त्यांचे आर्थिक उत्पन वाढावे, विविध

व्यवसाय कलांमध्ये युवक व युवतींनी पारंगत होऊन त्यांचे दैनदिन जीवनात त्यांना ते उपयुक्त ठरावे. या प्रशिक्षण योजने अंतर्गत प्रशिक्षण घेणा-या युवक व युवतींना त्यांचे जीवनमान उंचविणे, समाजप्रवाहात त्यांना मानाचे स्थान मिळण्याच्या उद्देशाने त्यांचा शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक विकास होण्यासाठी च्या हेतूने मागासवर्गीय युवक व युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण या योजने अंतर्गत विविध रोजगार/ स्वरोजगार पूरक प्रशिक्षणाचे आयोजन करणेत येत आहे. त्यामुळे प्रशिक्षित झालेल्या लाभार्थ्यांचे सर्वेक्षण करणे व त्यांचे उत्पन्न किती वाढेल, त्यांना रोजगार उपलब्ध झाले अथवा नाही या संबंधित तपासणीचे कामकाज योजनेच्या कामकाजात अंतर्भुत नसावे. विषयानुरुप अभ्यासक्रम पाहुनच व तो आपल्याला झेपेल याची खात्री वाटणा-या म्हणजेच तो कोर्स करण्याचे ज्ञान / कुवत / क्षमता असलेल्या गरजु युवक / युवतीच फाइल्स सादर करीत असतात. त्यामुळे विशिष्ट अशा शैक्षणिक अर्हतेच्या अटीची आवश्यकता नाही. त्यामुळे युवक/ युवतींना त्यांचे इच्छेनुरुप प्रशिक्षणास सहभागी होणेपासुन वंचित ठेवले / राहिले असे होणार नाही. केवळ शैक्षणिक अर्हतेतुन ज्ञानाची पातळी कळून येत नाही. त्यामुळे कुठलेही गरजु / इच्छुक युवक / युवती प्रशिक्षणापासून वंचित राहु नये, प्रशिक्षणात सहभागी करुन घेत नाही, अशा कुठल्याही प्रकारच्या तक्रारीस वाव राहु नये, या हेतुने कुठलीही / विशिष्ट शैक्षणिक अर्हता न ठेवता विविध व्यवसाय प्रशिक्षण राबविण्यास मान्यता देणेत यावी. यापूर्वी महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या योजनेअंतर्गत ज्या मागासवर्गीय महिला/मुली यांनी या योजनेअंतर्गत विविध प्रशिक्षण घेतलेले असले तरी "मागासवर्गीय युवकांना/ युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण" या योजनेमध्ये मागासवर्गीय महिला/मुली यांना सहभागी करुन घेणेस मान्यता देणेत यावी. युवक/ युवतींना त्यांच्या मागणीनुसार एकापेक्षा अधिक विषयांचे प्रशिक्षण देणेस तसेच युवक/युवतींच्या इच्छेनुसार एखादे/तेच प्रशिक्षण परत देणेस मागासवर्ग प्रवर्गातील युवक आणि युवतींचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक विकास होण्याच्या हेतूने धोरण म्हणुन मान्यता देणेत यावी. प्रशिक्षण घेणेस युवक/युवतींना प्रोत्साहन मिळावे व प्रशिक्षण घेण्यासाठी आर्थिक कारण त्यांना बाधक होऊ नये यासाठी व कुठलीही इच्छुक युवक/युवती प्रशिक्षणापासून वंचित राहु नये या कल्याणकारी उद्देशास पूरक व सुसंगत धोरण असावे या उद्देशाने सदर योजने अंतर्गतच्या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणास इच्छुक युवक/युवतींकडून यापूर्वी मनपा अंतर्गत चालणाऱ्या महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या योजनेच्या मंजूर धोरणाप्रमाणे प्रशिक्षण शुल्काच्या १०% प्रमाणे होणारी लाभार्थी सहभाग शुल्काची रक्कम "मागासवर्गीय युवकांना/ युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण" या प्रशिक्षण योजने अंतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या लाभार्थ्यांकडून स्वीकारण्यात येऊ नये. म्हणजेच युवक/ युवतींना मोफत प्रशिक्षणास धोरण म्हणून मान्यता देणेत यावी. वस्तीपातळीवर योजनेचा सुयोग्य प्रचार व प्रसार होणेसाठी तसेच युवक/युवतींना योजनेच्या अटी व शर्तीची स्पष्टपणे माहिती होणेसाठी चालुवर्षीच्या मान्यतेनुसार लाभार्थी पात्रता निकष (अटी व शर्ती) यामध्ये योग्य तो बदल करणेत यावा. प्रशिक्षणातील विलंब टाळण्याच्या दृष्टीने तसेच प्रशिक्षणाच्या विलंबाबतच्या कुठल्या ही तक्रारीस वाव राहु नये या हेतूने मे. नॅशनल कॉर्पोरेशन ऑफ इन्फॉरमेशन टेकनॉलॉजी (इंडिया)-एन.सि.आय.टी. (इंडिया) आकुर्डी, पुणे-१९ यांना वस्तीपातळीवरून इच्छुक युवक/युवतीं यांच्या ३० युवक/युवतींच्या मर्यादेत त्यांच्या मार्फत फाइल्स सादर करून सहभागी करून घेणेस मान्यता देणेत यावी.ह्या प्रमाणे त्यांचे गट तयार करून गटांच्या प्रशिक्षणाच्या अटी व शर्ती नुसारच्या कागदपत्रांच्या फाईल्स स्वीकारणेस मान्यता देणेत येत आहे. अशा प्रकारची सूचना

प्रशासनाकडुन सदरील संस्थेस देण्यात यावी. चालु वर्षातील प्रशिक्षणाचा विचार करता होणाऱ्या प्रशिक्षणाची देयके ही चालु सदर योजनेसाठी केलेल्या अंदाजपत्रकीय तरतुदीतून अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच वस्तीपातळीवरून ज्यांची मागणी असेल त्या सर्व मागासवर्गीय युवक/युवतींच्या प्रशिक्षणाच्या गटनिहाय फाईल्स स्वीकारणेत याव्यात. सदर योजेनेमध्ये आवश्यकतेनुसार बदल/दुरुस्ती करण्याचे/योजना अंमलबजावणी संबधित निर्णय घेऊन योग्य ती कार्यवाही करून योजना राबविण्यासंबंधीतचे व सदर योजनेअंतर्गतची देयके अदा करण्याचे सर्व अधिकार मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने मा. अतिरीक्त आयुक्त सो. यांना देणेस व सदर योजनेअंतर्गत होणारा प्रत्यक्ष खर्च हा मागासवर्गीय युवकांना/ युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण” या उपलेखाशिर्षावर सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या/होणा-या तरतुदीमधुन करणेस मान्यता देणेत यावी. संभाव्य कामापोटी संस्थेस देय असलेल्या प्रत्यक्ष प्रशिक्षण शुल्काच्या रक्कमेच्या ५% प्रमाणे होणारी रक्कम ही संस्थेकडुन अनामत व लेखापरीक्षण पुर्ततेकामी म्हणून घेणेत यावी. तथापी सदर अनामत रक्कमेच्या तुलनेत जादा काम होणार असेल तर त्यानुसारच्या संभाव्य ज्यादा कामापोटीच्या ५% प्रमाणे होणारी रक्कम संस्थेकडुन आगाऊ भरून घेण्यात यावी. सदरची होणारी अनामत रक्कम ही मोठी असल्याने संस्थेच्या मागणीचा व त्यांचे आर्थिक निकडीचा विचार करता चालु वर्षाचे काम पूर्ण झालेनंतर सदर रक्कमेपैकी ४% रक्कम ही संस्थेस त्वरीत परत करावी. मात्र उर्वरीत १% रक्कम हि मनपातील लेखापरीक्षणानंतर लेखापरीक्षणातील सर्व अक्षोपाधिन आक्षेप व वसुलपात्र आक्षेप याची १००% पुर्तता संस्थेमार्फत सादर झालेनंतर सदरची रक्कम संस्थेस परत देणेत यावी. तथापी याबाबत प्रशासकीय स्तरावर योग्य तो निर्णय घेणेस मान्यता देणेत येत आहे. सन २०२०-२०२१ च्या अंदाजपत्रकामध्ये नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत “मागासवर्गीय युवकांना/ युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण” योजनेसाठी आर्थिक तरतुद करणेत आलेली आहे. त्यात “मागासवर्गीय युवकांना/ युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण” या उपलेखाशिर्षाचा समावेश आहे. तरी “मागासवर्गीय युवकांना / युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण” या उपलेखाशिर्षावर या कामासाठी निधी राखीव आहे. सदरील कामासाठी वाढीव निधीची गरज असलेस आवश्यक तो वाढीव निधी महापालिकेच्या स्थापत्य विभागाकडील राखीव निधीच्या केलेल्या ५% तरतुदीमधून सक्षम समित्यांच्या मान्यतेने वर्ग करणेत याव्यात. स्थापत्य विभागाकडील राखीव निधीच्या केलेल्या तरतुदीमधून इतर अन्य विभागातील उपलेखाशिर्षाअंतर्गत केलेल्या तरतुदीमधुन चालुवर्षी “मागासवर्गीय युवकांना/ युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण” या योजनेसाठी लाभार्थ्यांच्या प्रतिसादानुसार प्रशिक्षणाचे वाढीव खर्चाकामी आवश्यकतेनुसार रक्कमा वर्ग करणेस व त्यानुसार “मागासवर्गीय युवकांना/ युवतींना विविध व्यवसाय प्रशिक्षण” योजना ही मे.नॅशनल कॉर्पोरेशन ऑफ इन्फॉरमेशन टेकनॉलॉजी (इंडिया) - एन.सि.आय.टी. (इंडिया) आकुर्डी, पुणे-१९ यांचेमार्फत सन २०२०-२०२१ साठी ह्या आर्थिक वर्षातील दिनांक ३१/०३/२०२१ अखेरपर्यंतच्या कालावधीत राबविणेकामी व योजनेच्या अंमलबजावणीकामीच्या धोरणास व सदर प्रशिक्षण देणेस येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१६६ विषय क्रमांक – ७
दिनांक – १७/०६/२०२० विभाग – स्थापत्य BSUP प्र.
सुचक – मा. राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.शितल शिंदे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/ BSUP प्र./२५८/२०२०, दि.०९/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

JnNURM - BSUP शहर झोपडपट्टी पुनर्वसन अंतर्गत अजंठानगर, मिलिंदनगर, वेताळनगर व विठ्ठलनगर येथे झोपडपट्टी पुनर्वसनाचे काम पूर्ण झाले आहे सदर प्रकल्पास दि.०४/०७/२०१९ रोजी Consent to Operate Part प्राप्त झाले आहे. सदर Consent to Operate नुसार मुदत दि.३१/०१/२०२० पर्यंत आहे. सदर प्रकल्पांच्या Consent Order मध्ये नमुद केलेल्या इमारतींवर सिमीत झालेला असून प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले आहे. त्यामुळे तेथे नव्याने JnNURM अंतर्गत कोणतीही इमारत बांधणेत येणार नाही. तथापि, मा.सक्षम प्राधिकारी तथा सहा.आयुक्त, झोनिपू प्रशासन विभागाकडून ताबा आदेश प्राप्त नसल्याने अजंठानगर, वेताळनगर, मिलिंदनगर व विठ्ठलनगर प्रकल्पामधील उर्वरित सदनिकांचे हस्तांतरण करता येत नाही. सदर सदनिका लाभार्थ्यांना हस्तांतरित करणेकामी किती वेळ लागेल याबद्दल स्पष्टता नाही. त्यामुळे उपरोक्त प्रकल्पांच्या Consent to Operate चे नुतनीकरण ३ वर्ष म्हणजेच दि.३१/०१/२०२३ पर्यंत करावे लागणार आहे व तीन वर्षाच्या नुतनीकरणासाठी लागणारी शुल्क भरावे लागणार आहे. सदर शुल्क MPCB कडे RTGS / NEFT द्वारे भरणेचे आहे. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे.

**Bank Details for RTGS/NEFT**

Account Name: **Maharashtra Pollution Control Board**
Bank Name: **State Bank of India**
Bank Account No: **33874078751**
Bank Account Type: **Current Account**
Bank Address: **76-A, Rafi Ahmed Kidwai Rd, Gujarati Kelwani Mandal School, Matunga Br. Mumbai- 400 015.**
IFSC Code: **SBIN0005350**
MICR Code: **400002056**
Email: **aao_ecmpcb@mpcb.gov.in**

MPCB च्या Fee Structure नुसार खालील प्रमाणे फी अदा करावी लागणार आहे.

| Consent To Operate Project चे नाव | Consent To Operate प्राप्त इमारती | प्रकल्पावर डिसेंबर २०१९ अखेर झालेला खर्च | त्या प्रमाणात तीन वर्षासाठी (दि.३१/०१/२०२० ते ३१/०१/२०२३ पर्यंत) लागणारी फी |
|---|---|---|---|
| अजंठानगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | ७ | २१,७६,९०,००० | १,५०,०००/- |
| वेताळनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | ९ | ५८,१८,९७,००० | ३,००,०००/- |
| मिलिंदनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | ५ | ३७,०४,२४,००० | २,२५,०००/- |
| विठ्ठलनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १३ | ६८,९६,४७,००० | ३,००,०००/- |
| **एकुण** | | | ९,७५,०००/- |

सबब, वरील प्रकल्पातील इमारतींकरीता MPCB कडून Consent to Operate च्या नुतनीकरणाकरीता र.रु.९,७५,०००/- (अक्षरी र.रु.नऊ लाख पंच्याहत्तर हजार फक्त) त्यांचेकडे जमा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१६७ विषय क्रमांक – ८
दिनांक – १७/०६/२०२० विभाग – नगररचना व विकास
सुचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.संतोष कांबळे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/१५/७४/२०२०, दि.१०/०६/२०२०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

